# पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद शहर
डॉ.बा.आं.मार्ग, मिल कॉर्नर, औरंगाबाद शहर-४३१००१ (महाराष्ट्र)

दि. 05/09/2017

प्रेस नोट

## पोलीस स्टेशन जवाहरनगर डी.बी. पथकांनी केले हद्दपार आरोपीस अटक.

दि.05/09/2017- जवाहरनगर पोलीस गणेश उत्सव काळात ठाणे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना जवाहरनगर पोलीस ठाणेच्या डी.बी पथकास त्रिमूर्ती चौक, जवाहर कॉलनी, औरंगाबाद या ठिकाणी हद्दपार आरोपी विजय बिरारे, वय 19 वर्ष रा.विष्णूनगर गल्ली नं.7 औरंगाबाद हा मिळून आला. त्याच्या विरुद्ध पोलीस ठाणे जवाहरनगर येथे वेगवेगळे गुन्हे दाखल आहेत. त्यानुसार प्रतिबंधक कारवाई म्हणून पोलीस उप आयुक्त परिमंडळ (२) औरंगाबाद शहर यांचे तडीपारीचे आदेश असताना औरंगाबाद शहरात वास्तव्य करताना आढळून आला. यावरून त्याविरुद्ध पो. स्टे. जवाहरनगर गु.र.न 268/2017 महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२ प्रमाणे गुन्हा दाखल करून आरोपीस अटक करण्यात आली आहे. हि कामगिरी जवाहरनगर गुन्हे शोध पथकाचे पोउपनि.बाळासाहेब आहेर, पोहेकॉ/माणिक हिवाळे, पोकॉ/सुखदेव जाधव, पांडुरंग तुपे यांनी केली.

# पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद शहर

डॉ.बा.आं.मार्ग, मिल कॉर्नर, औरंगाबाद शहर-४३१००१ (महाराष्ट्र)


दि. 05/09/2017

प्रेस नोट

## आठवडी बाजारात मोबाईल चोरी करणाऱ्या इसमास जवाहरनगर पोलिसांकडून अटक

दि. 05.09.2017 - जवाहर पोलीस स्टेशनचे डी. बी. पथक हे गणपती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर व आठवडी बाजारानिमित्त गस्त घालत होते. पोलिसांना एक संशयित इसम बाजारात फिरताना मिळून आल्याने त्यास ताब्यात घेऊन विचारपूस केली असता त्याने त्याचे नाव शेख समीर शेख अय्युब वय-24 वर्ष रा. कौसर पार्क, देवळाई रोड, औरंगाबाद असे सांगितले. जवाहरनगर पोलिसांनी त्यास पोलीस स्टेशन येथे आणून त्याची अंगझडती घेतली असता त्याच्या ताब्यातून 48,000/- रु. किंमतीचे एकूण 05 मोबाईल मिळून आले. त्यास सदर मोबाईल बाबत विचारपूस केली असता तो उडवाउडवीचे उत्तर देत होता. त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता त्याने सदर मोबाईल हे आठवडी बाजारातून चोरी केल्याची कबुली दिली. आरोपी शेख समीर शेख अय्युब विरुद्ध पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे गु.र.न. 274/17 कलम 379 भा.द.वि. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई जवाहरनगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अविनाश आघाव, सपोनि. कांबळे, पो.उप.नि. बाळासाहेब आहेर, सफौ. निकम, पोहेकॉ. माणिक हिवाळे, कृष्णा बोऱ्हाडे, मंगेश गायकवाड, अनिल नागपुरे, पोना. मदन, डोईफोडे,काळे, गव्हाणे, पोकॉ. सुखदेव जाधव, पाडुरंग तुपे, विजय वानखेडे व थोरात यांनी केली.

# पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद शहर

डॉ.बा.आं.मार्ग, मिल कॉर्नर, औरंगाबाद शहर-४३१००१ (महाराष्ट्र)


दि. 05/09/2017

**प्रेस नोट**

## आर्थिक गुन्हे शाखेने बेकायदेशीर दारू विक्री करणाऱ्यास केले जेरबंद.

दि.05.09.2017:- आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस उप निरीक्षक सुभाष खंडागळे व त्यांचा स्टाफ गणपती विसर्जनाच्या अनुषंगाने हर्सूल भागात पेट्रोलिंग करीत असताना पोलीस हवालदार विलास कुलकर्णी यांना त्यांच्या गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली कि न्यू चेतनानगर येथे एक 35 ते 40 वर्ष वयाचा इसम विनापरवाना बेकायदेशीररित्या दारूची चोरटी विक्री करीत आहे अशी खात्रीलायक बातमी मिळाल्यावरून आर्थिक गुन्हे शाखेचे पो.उप.नि. सुभाष खंडागळे व त्यांच्या पथकाने छापा मारून आरोपी नामे अण्णा गोरख गुंजाळ, वय- 38 वर्ष, रा. न्यू चेतनानगर, औरंगाबाद यास ताब्यात घेण्यात आले. त्याच्या ताब्यातून 35 सीलबंद काचेच्या बाटल्या किंमत रु. 1820/- रु. व त्याच्याकडील रोख रक्कम 200/- रु. असा एकूण 2,020/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आर्थिक गुन्हे शाखेचे पोकॉ. सुनुल शामराव फेपाळे यांनी सरकार तर्फे फिर्याद देऊन नमूद आरोपीविरुद्ध हर्सूल पोलीस स्टेशन येथे महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम 65 (ख) प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला आहे. ही कारवाई आर्थिक गुन्हे शाखेचे पो.उप.नि सुभाष खंडागळे, पोलीस हवालदार प्रकाश काळे, विलास कुलकर्णी, पोलीस शिपाई सुनुल शामराव फेपाळे, महिला पोलीस शिपाई जयश्री फुके यांनी केली.

# पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद शहर

डॉ.बा.आं.मार्ग, मिल कॉर्नर, औरंगाबाद शहर-४३१००१ (महाराष्ट्र)

दि. 05/09/2017

<u>प्रेस नोट</u>

**पुंडलिकनगर पोलिसांची कारवाई 3,120/- रु. किंमतीच्या देशी दारूच्या बाटल्या जप्त.**

दि.05.09.2017- पुंडलिकनगर पोलिसांना गणेश विसर्जन मिरवणुकी दरम्यान गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाल्या वरून नवनाथ नगर येथे छापा मारून देशी दारूच्या 60 बाटल्या 3,120/- रु. किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. पोलीस निरीक्षक अशोक मुदीराज यांनी अधिक माहिती दिली कि, पोकॉ/रवी जाधव यांना विसर्जन मिरवणुकी दरम्यान पेट्रोलिंग करीत असताना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली कि, नवनाथ नगर यथे एक महिला बेकायदेशीररीत्या दारू विक्री करीत आहे, अशी खात्रीलायक बातमी मिळाल्यावरून पुंडलिकनगर पोलिसांनी नवनाथ नगरमध्ये छापा मारला असता 41 वर्षीय महिलेला पुंडलिक नगर पोलिसांनी ताब्यात घेवून तिच्याकडून  देशी दारूच्या 60 बाटल्या किंमत 3,120/- रु. किंमतीचा मुद्देमाल बेकायदेशीररित्या विनापरवाना विक्री करत असल्याने जप्त करण्यात आला. पो.कॉ. रवी जाधव यांनी सरकारतर्फे फिर्याद देऊन आरोपी महिले विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हि कारवाई पोलीस निरीक्षक अशोक मुदीराज, म.पो.उप.नि.अनिता फसाटे, पो.कॉ.रवी जाधव, देशमुख, म.पोकॉ.जाभोटकर यांनी केली.

SD/-

(रामेश्वर थोरात)

सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे)

औरंगाबाद शहर